# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८५ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८३२ : रामोशी उमाजी नाईक यांना फाशी दिली.
१९२४ : अमेरिकेतील शिक्षणतज्ज्ञ कुझे विल्स यांचा जन्म झाला.
१९२५ : भारतातील पहिली विद्युत रेल्वे मुंबई ते कुर्ला या लोहमार्गावर सुरु झाली.
१९३४ : उत्कृष्ट हॉकीपटू काशिक हरपाल यांचा जन्म झाला.

सेन्सेक्स ८१,६६६.४६ +९४३.५२ (१.१७%)
डॉलर ₹ ९१.४९

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १६ |
| दिल्ली | २१ | १० |
| मुंबई | ३५ | २१ |
| नागपूर | ३१ | १५ |
| पुणे | ३२ | १२ |

**सुविचार**

आत्मसमाधान ही खरी समृद्धी आहे; ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करा.

**सुर्योदय - सुर्यास्त**
स.-७:०४ संध्या-६:१९

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५०,८६०/- ३,००,०००/-

**केळी भाव**
नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----


# माजी लष्करप्रमुख नरवणेंच्या अप्रकाशित पुस्तकावरुन लोकसभेत हंगामा

## पुस्तक प्रकाशित होऊ दिलं जात नसल्याचा राहुल गांधींनी केला आरोप

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**माजी लष्कर प्रमुख जनरल एम. एम. नरवणे यांनी Four Stars of Destiny हे आत्मचरित्र लिहिलं आहे. हे पुस्तक अद्याप प्रकाशित झालेलं नाही. दरम्यान या पुस्तकातल्या उल्लेखांच्या वाचनाच्या मुद्द्यावर लोकसभेत बराच गदारोळ झाल्याचं पाहण्यास मिळालं. त्यानंतर लोकसभेचं कामकाज मंगळवारपर्यंत तहकूब करण्यात आलं आहे. दरम्यान एम. एम. नरवणे यांचं पुस्तक प्रकाशित होऊ दिलं जात नाहीये असाही आरोप राहुल गांधींनी केला.**






राहुल गांधींकडून सेवानिवृत्त जनरल नरवणे यांच्या पुस्तकाचा संदर्भ देण्याचा प्रयत्न झाला, तर पुस्तक प्रकाशित झालेले नाही त्यामुळे संदर्भ देता येत नाही, मंत्री राजनाथ सिंह यांनी आक्षेप घेतला. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही जनरल नरवणे यांचं पुस्तक प्रकाशित झालेलं नाही असं अमित शाह यांनीही म्हटलं आहे. राहुल गांधींकडून भारत चीन सीमेवर झालेल्या संघर्षाच्या अनुषंगाने मुद्दा उपस्थित (पान २ वर)

### ➢ लोकसभेत काय घडलं?

राहुल गांधींकडून सेवानिवृत्त जनरल नरवणे यांच्या पुस्तकाचा संदर्भ देण्याचा प्रयत्न झाला, तर पुस्तक प्रकाशित झालेले नाही त्यामुळे संदर्भ देता येत नाही, मंत्री राजनाथ सिंह यांनी आक्षेप घेतला. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही जनरल नरवणे यांचं पुस्तक प्रकाशित झालेलं नाही असं अमित शाह यांनीही म्हटलं आहे. राहुल गांधींकडून भारत चीन सीमेवर झालेल्या संघर्षाच्या अनुषंगाने मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न झाला. मात्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही आक्षेप घेतला. पुस्तक प्रकाशित झालं आहे की नाही ते राहुल गांधींनी सांगावं, अशी मागणी लोकसभेत करण्यात आली ज्यावरुन गदारोळ झाला.

# १५ फेब्रुवारीला उत्तर महाराष्ट्र विद्रोही मराठी साहित्य संमेलन

**● अध्यक्षपदी बी. जे. वाघ यांची निवड**

वृत्तसंस्था । मालेगाव

१५ फेब्रुवारी २६ रोजी मनमाड (जि. नाशिक)येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य नगरी येथे पहिले उत्तर महाराष्ट्र विभागीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन होत आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी जेष्ठ साहित्यिक व माजी सनदी अधिकारी बी.जे.वाघ यांची निवड करण्यात आली आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे राज्य उपाध्यक्ष अर्जुन बागूल यांनी ही माहिती दिली आहे.



विद्रोही सांस्कृतिक चळवळ १९९९ पासून महाराष्ट्रभर कार्यरत आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी ग्रंथकार सभेस पाठविलेले पत्र हा विद्रोहींचा वैचारिक जाहीरनामा आहे.अखिल भारतीय साहित्य संमेलन आणि महामंडळ यांचा आजवरचा व्यवहार हा विषमतावादी राहिला असल्याचा विद्रोहींचा आक्षेप आहे. संयुक्त महाराष्ट्राचे सेनानी शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर, शाहीर अमर शेख, शाहीर वामनदादा कर्डक,शाहीर यशवंत चकोर, क्रांतीसिंह नाना पाटील, भाई उद्धवराव पाटील, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, यांना संमेलनासाठी साधे निमंत्रण न देणे; स्वातंत्र सैनिक व थोर गांधीवादी नेत्या नयनतारा सहेगल यांना यवतमाळला उद्धाटक म्हणून बोलावून नंतर अपमानित करणे, अशी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या विषमतावादाची असंख्य उदाहरणे आहेत. म्हणूनच विषमतावादी सांस्कृतिक विचारांचा विषारी प्रचार-प्रसार (पान २ वर)

## थोडक्यात

### राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाल्यास इंडिया आघाडीत फूट?

**मुंबई ।** अजित पवार यांच्या निधनानंतर विलीनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला आहे. विलीनीकरणाच्या चर्चेपासून शरद पवारांनी स्वतःला दूर ठेवले असले तरी विलीनीकरण झाल्यास शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी सरकारमध्ये सामील होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशात इंडिया आघाडीतील नेत्यांनीही विलीनीकरणावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. विलीनीकरण झाल्यास शरद पवार गट इंडिया आघाडीतून बाहेर पडणार का? असाही प्रश्न निर्माण होत आहे.

### विदर्भात रोजगाराची मोठी संधी

**नागपूर ।** नागपूर विद्यापीठाच्या अंबाझरी-अमरावती मार्गावरील परिसरात ६ ते ८ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या ॲडव्हांटेज विदर्भ २०२६ खासदार औद्योगिक महोत्सवातील आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषदेकरिता प्रथमच २३ हून अधिक देशांचे राजदूत व व्यापार प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या उपक्रमातून विदर्भातील आणि स्थानिक उद्योगांना निर्यातीच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील, अशी माहिती असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

### अर्थसंकल्पातील घोषणांमुळे पर्यटनाला सुगीचे दिवस

**मुंबई ।** केंद्र सरकारने अर्थसंकल्पात पर्यटन क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रीत केले. त्यामुळे अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आता पर्यटन उद्योगासाठी सुगीचे दिवस येण्याची शक्यता आहे. ऐतिहासिक स्थळांचा विकास, इको-टुरिझम, मेडिकल टुरिझम, कुशल मनुष्यबळ निर्मिती आणि करसवलती अशा बहुआयामी घोषणांमुळे पर्यटन क्षेत्राला नवसंजीवनी मिळणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ९० व्या वर्षी दलाई लामांनी जिंकला पहिला ‘ग्रॅमी पुरस्कार’

वृत्तसंस्था । लॉस एंजेलिस

**जगाला शांतता आणि अहिंसेची शिकवण देणारे तिबेटी धर्मगुरू दलाई लामा यांनी वयाच्या ९० व्या वर्षी ग्रॅमी पुरस्कार जिंकला आहे. संगीत आणि कलेच्या जगातील सर्वात मोठ्या व्यासपीठावर त्यांनी हा पुरस्कार मिळवला आहे.**

अमेरिकेतील लॉस एंजेलिस या शहरात पार पडलेल्या ६८ व्या वार्षिक ग्रॅमी पुरस्कार समारंभात दलाई लामा यांना ग्रॅमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दलाई लामा हे तिबेटी बौद्ध धर्मातील सर्वोच्च आध्यात्मिक नेते आहेत. ‘दलाई लामा’ या शब्दाचा अर्थ ‘ज्ञानाचा महासागर’ असा होतो. सध्याचे दलाई लामा हे १४ वे दलाई लामा आहेत. त्यांचे नाव तेन्झिन ग्यात्सो असे आहे. दलाई लामा यांना ‘सर्वोत्तम ऑडिओ बुक, कथन आणि कथाकथन रेकॉर्डिंग’ या श्रेणीत हा पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या अल्बममध्ये ध्यानाचे सखोल बारकावे आणि जीवनातील त्यांचे अनुभव मांडले (पान २ वर)

# पाकिस्तान बॉम्ब हल्ल्यांनी हादरला

## सैन्य-बंडखोरांमधील चकमकीत शेकडो जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था । इस्लामाबाद

**पाकिस्तानमधील बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानी लष्कर आणि बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) यांच्यामध्ये संघर्ष सुरू आहे. पाकिस्तानच्या सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईमुळे हा संघर्ष आणखीनच चिघळल्याचे चित्र आहे. या कारवाईला उत्तर म्हणून दहशतवाद्यांनी केलेल्या सततच्या हल्ल्यांमुळे पाकिस्तान हादरला आहे.**

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, अलीकडच्या काळात बलुचिस्तानमध्ये झालेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या सुरक्षा दलांनी ४० तासांच्या कालावधीत १४५ अतिरेक्यांना ठार मारले. यापूर्वी असोसिएटेड प्रेसने



वृत्त दिले होते की, बलुचिस्तानमध्ये अनेक आत्मघाती बॉम्बस्फोट आणि

**बलुचिस्तानच्या क्वेटा, ग्वादर, मस्तुंग, नोशकी, दलबंदीन, खारन, पंजगुर, तुमप व पासनी या शहरांमध्ये एकापाठोपाठ एक हल्ले झाले. दहशतवाद्यांनी पोलीस ठाणे, सुरक्षा चौक्या, प्रशिक्षण केंद्रे, बँका, बाजारपेठ आणि सरकारी कार्यालयांवर हल्ले केले.**

बंदुकीच्या हल्ल्यांमध्ये किमान ३३ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर सुरक्षा दलांनी ९२ हल्लेखोरांना ठार मारले.सुमारे ४० तास चाललेल्या या गोळीबार आणि बॉम्बस्फोटांच्या सत्रात अनेक नागरिक आणि सुरक्षा दलाचे (पान २ वर)

# अजित पवारांच्या निधनाने बीडच्या पालकमंत्रीपदाचा पुन्हा पेच!

वृत्तसंस्था । छत्रपती संभाजीनगर

**मराठा ओबीसी समाजातील दूही, प्रशासकीय पातळीवरील अनागोंदी या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्री म्हणून काम पाहिले. प्रशासकीय पातळीवर महसूल आणि पोलीस अधिकाऱ्यांना काम करा हा संदेश त्यांनी दिल्यानंतर बीडमध्ये काही सुधारणा दिसू लागल्या होत्या. मात्र, अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर बीडच्या पालकमंत्री पदी कोण, असा पेच पुन्हा निर्माण झाला आहे.**

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाशी शपथ घेतली असली तरी बीडसारख्या संवेदनशील जिल्ह्यातील पालकमंत्री अधिक प्रगल्भ आणि प्रशासकीय पातळीवर अधिक पकड असणारा हवा, अशी मागणी केली जात आहे. पालकमंत्री पद स्वीकारल्यानंतर पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधकाऱ्यांना काम करण्यास मुभा दिल्याने बीडमध्ये अनेक सुधारणा दिसू लागल्या आहेत. माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी मात्र सुनेत्राताई पवार यांनीच हे पदही स्वीकारवे, असे म्हटले आहे.

# पुण्यातील सिंहगड डेंटल कॉलेजची मान्यता रद्द; विद्यार्थ्यांचे काय होणार?

वृत्तसंस्था । नाशिक

**विद्यापीठ अधिनियमातील अटी व शर्तींचा भंग केल्याचा ठपका ठेवत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने (एमयुएचएस) पुण्यातील सिंहगड दंत महाविद्यालय आणि रुग्णालयावर मोठी कारवाई केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून या महाविद्यालयाच्या पदवी (बीडीएस) आणि पदव्युत्तर (एमडीएस) अभ्यासक्रमाची संलग्नता रद्द करण्यात आली आहे. शिक्षकांच्या थकीत वेतनाचा प्रश्न संस्थेने सोडवला नाही. परिणामी, कामबंद आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याकडे विद्यापीठाने लक्ष वेधले आहे.**

पुण्यातील सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे हे सिंहगड दंत महाविद्यालय



आहे.

महाविद्यालयातील ७८ शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या गाऱ्हाणे निवारण समितीकडे दाद मागितली होती. संबंधित कर्मचाऱ्यांचे मे २०१४ पासूनचे वेतन थकीत आहे. मध्यंतरी तीन वर्षांचे मूळ वेतन देताना संपूर्ण वेतनावर प्राप्तिकर वजा करण्यात आला, तसेच एकदा काही महिन्यांचे वेतन देऊन ते परत घेतले गेल्याची तक्रारही कर्मचाऱ्यांनी केली आहे. थकीत वेतनासाठी १० नोव्हेंबर २०२५ पासून कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले. या काळात विद्यापीठाने वारंवार निर्देश देऊनही संस्थेने त्याचे पालन केले नाही. याबद्दल महाविद्यालयावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई देखील करण्यात आली होती.

या प्रकरणात विद्यापीठाने स्थापन केलेल्या त्रिसदस्यीय समितीने अहवाल सादर केला. आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असून रुग्णालयीन सेवाही विस्कळीत झाल्याचे समोर आले आहे. या संदर्भात आरोग्य विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या उपस्थितीत बैठक पार पडली होती. सिंहगड टेक्निकल सोसायटीच्या संचालकांनी आठवडाभरात वेतन अदा करावे, संप मिटल्यानंतर विद्यार्थ्यांचे अतिरिक्त वर्ग घेऊन शैक्षणिक कामकाज नियमित करावे आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचा अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

# जम्मू-काश्मीरमध्ये भूकंपाचे धक्के रिश्टर स्केलवर ४.६ एवढी तीव्रता



वृत्तसंस्था । बारामुल्ला

जम्मू आणि काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात आज सकाळी ४.६ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पहाटे ५:३५ च्या सुमारास भूकंप झाला, त्यामुळे अनेक भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि लोक घराबाहेर पळाले. भूकंपाचे केंद्र बारामुल्ला जिल्ह्यातील पट्टन परिसरात असल्याचे वृत्त आहे.

भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की ते आजूबाजूच्या परिसरातही जाणवले. आतापर्यंत कोणत्याही प्रकारची जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. स्थानिकांच्या मते, काही सेकंदांसाठी भूकंपाचे धक्के जाणवले, ज्यामुळे घरांच्या (पान २ वर)

# केंद्रीय अर्थसंकल्पातून खान्देशच्या विकासाला नवी गती

## ● पूर्व-पश्चिम मालवाहू कॉरिडॉरमुळे जळगाव, धुळे ,नंदुरबारचा औद्योगिक नकाशा बदलणार

प्रतिनिधी । जळगाव

केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात उत्तर महाराष्ट्रातील खान्देश विभागासाठी दीर्घकालीन विकासाची ठोस दिशा निश्चित केली आहे. पायाभूत सुविधा, दळणवळण, औद्योगिक गुंतवणूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रावर केंद्र सरकारने दिलेल्या विशेष भरामुळे जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांसाठी पुढील १० वर्षे निर्णायक ठरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. दीर्घकाळ विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या खान्देशसाठी हा अर्थसंकल्प ‘गेम चेंजर’ ठरेल, असा आशावादी अंदाज तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात औद्योगिक कॉरिडॉर आणि मालवाहतूक प्रकल्पांना (पान २ वर)



### लॉजिस्टिक्स आणि उद्योगांना नवे बळ

ईडब्ल्यूडीएफसीमुळे पालघर, जेएनपीटी, हाजीरा, दहेज, मुंद्रा आणि पीपावाव यांसारख्या प्रमुख बंदरांचा थेट संपर्क पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड आणि छत्तीसगड या राज्यांशी प्रस्थापित होणार आहे. डबल-स्टॅक मालवाहू रेल्वेमुळे कोलकाता ते सुरत हा प्रवास अवघ्या ३० तासांत पूर्ण होणार असल्याने उद्योगांना वेळ आणि खर्चात मोठी बचत होणार आहे. परिणामी खान्देशात ड्राय पोर्ट, वेअर हाऊसिंग, लॉजिस्टिक्स पार्क आणि वाहतूक आधारित उद्योग मोठ्याप्रमाणात उभे राहण्याची शक्यता आहे.

# जंगल रक्षणासाठी एम. एस. वॉच टॉवर उभारणार; धुळे वनविभागाचा मोठा निर्णय

प्रतिनिधी । धुळे

**पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्र वाढ आणि भविष्यातील पिढ्यांसाठी वनसंपत्ती जपण्याच्या दृष्टीने महत्वाची अशी विविध कामे वन विभागातर्फे हाती घेण्यात येणार आहेत. याचाच एक भाग म्हणजे ‘एम. एस. वॉच टॉवर’ होय. हा टॉवर उभारून वन संपत्तीवर सतत लक्ष ठेऊन गुन्हेगारीला आळा घालणे शक्य होणार आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या वन विभागामार्फत धुळे वन विभागातील कॅम्पा अंतर्गत वृक्षलागवड क्षेत्रांच्या संरक्षणासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात आली असून, यासाठी वन विभागाच्यावतीने आवश्यक त्या भागात थेट ङ्गएम. एस. वॉच टॉवरफ उभारण्याची तयारी झाली आहे. विविध ठिकाणी चेन लिंक कुंपण उभारणी तसेच वॉच टॉवर बांधकामाची कामे प्रस्तावित आहेत. शिरपूर व शिंदखेडा तालुक्यातील एकूण जवळपास दहा ठिकाणी अशी विविध कामे करण्यात येणार आहेत. बोराडी (ता. शिरपूर) येथील गुऱ्हाळपाणी, बुडकी आणि धनवाडी (पान २ वर)

# संपादकीय

## पायाभूत सुविधांना मेगाबूस्टर

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवर आधारित विकासाला गती देण्यासाठी भांडवली खर्चात (कॅपिटल एक्स्पेंडिचर) मोठी वाढ करण्याची घोषणा केली आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी सरकारने १२.२ लाख कोटी रुपयांचा भांडवली खर्च प्रस्तावित केला असून, चालू आर्थिक वर्षातील ११.२ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत ही लक्षणीय वाढ आहे. गेल्या दशकात सार्वजनिक गुंतवणुकीत झालेली ही वाढ थक्क करणारी असून, २०१४-१५ मधील २ लाख कोटी रुपयांवरून हा प्रवास आता ११.२ लाख कोटी रुपयांच्या पार गेला आहे. यावेळच्या अर्थसंकल्पीय भाषणात शहरांच्या माध्यमातून आर्थिक विकासाला गती देण्यासाठी सरकारने 'सीटी इकॉनॉमिक रिजन' ही संकल्पना मांडली आहे. ५ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने 'टियर-२' आणि 'टियर-३' शहरांचा समावेश असून, ही शहरे आता देशाची महत्त्वाची आर्थिक विकास केंद्रे म्हणून उदयास येत आहेत. या शहरांमध्ये पायाभूत सुविधांचे जाळे विणल्यामुळे केवळ नागरी जीवन सुसह्य होणार नाही, तर रोजगाराच्या मोठ्या संधीही निर्माण होतील. सरकारने या खर्चाद्वारे खासगी गुंतवणुकीला आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, जेणेकरून अर्थव्यवस्थेची मागणी अधिक मजबूत होईल. देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग पाहिला तर चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर ७.४ टक्के राहण्याचा अंदाज आहे.

# जळगाव महापौरपदी दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी!

## भाजप-शिवसेनेचा समन्वयातून निर्णय; आता केवळ औपचारिक निवडीची घोषणा बाकी

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत सिद्ध करणाऱ्या महायुतीकडून इतके दिवस महापौर आणि उपमहापौर पदाच्या उमेदवारांबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती. मात्र, सोमवारी अर्ज भरण्याच्या काही वेळेआधी भाजप नेते मंत्री गिरीश महाजन आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दोन्ही नावांची थेट घोषणा केली.**

महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक ४६ जागांवर विजय मिळवत स्पष्ट आघाडी घेत महापालिकेतील आपले वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित केले होते. शिवसेनेच्या शिंदे गटाला २२ जागा मिळाल्या होत्या. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) एका नगरसेवकासह एका अपक्ष नगरसेवकाने शिंदे गटाला पाठिंबा दिल्यामुळे महायुतीचे एकूण संख्याबळ ७० वर जाऊन पोहोचले होते. या मजबूत बहुमतामुळे महापालिकेतील सत्ता वाटपाचे चित्र जवळपास स्पष्ट झाल्याने महापौर पद भाजपकडे आणि उपमहापौर पद शिवसेनेकडे जाणार, हे जवळपास निश्चित मानले जात होते.



त्यानुसार महापौर आणि उपमहापौर पदांच्या निवडीसाठी गेल्या दोन दिवसांत राजकीय हालचालींना चांगलाच वेग आला.दोन्ही पक्षांमध्ये या महत्त्वाच्या पदांसाठी इच्छुकांची संख्या मोठी असल्याने उमेदवारीसाठी जोरदार रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र दिसून आले. विशेषतः भाजपमध्ये अंतर्गत स्पर्धा अधिक तीव्र होती. त्यामुळे भाजपकडून कोणाला महापौरपदाची संधी मिळणार आणि शिवसेनेच्या शिंदे गटाकडून उपमहापौर पदासाठी कोणाचे नाव पुढे येणार, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. महापौर आणि उपमहापौर पदांच्या निवडीसाठी सोमवारी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची वेळ निश्चित करण्यात आली होती. या कालावधीत दोन्ही पदांसाठी नेमके किती अर्ज दाखल होतात आणि कोणाची नावे समोर येतात, याकडे राजकीय वर्तुळासह सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, प्रत्यक्षात ही प्रक्रिया केवळ औपचारिक ठरणार, हे आधीपासूनच स्पष्ट झाले होते. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) या दोन्ही पक्षांकडून महापौर व उपमहापौर पदासाठी उमेदवार आधीच निश्चित करण्यात आल्याने दोन्ही पदांची बिनविरोध निवड जवळपास निश्चित मानली जात होती. त्यामुळे अर्ज दाखल होण्याच्या वेळेपूर्वीच सत्ताधारी महायुतीने आपली रणनीती स्पष्ट केली. सोमवारी मंत्री गिरीश महाजन आणि गुलाबराव पाटील यांनी संयुक्तरित्या दोन्ही पदांसाठी उमेदवारांची नावे अधिकृतपणे जाहीर केली. त्यांच्या या घोषणेमुळे महापालिकेतील सत्ता समीकरणांवर शिक्कामोर्तब झाले. अर्ज दाखल करण्याच्या वेळेत कोणताही विरोधी अर्ज येण्याची शक्यता संपुष्टात आली. आणि दोघांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. या वेळी बोलताना दोन्ही मंत्र्यांनी पक्षातील इतर इच्छुकांनाही आश्वासन दिले. सध्या संधी न मिळालेल्या नगरसेवकांना पुढील टप्प्यात जबाबदाऱ्या दिल्या जातील, असे सूतोवाच त्यांनी केले. यामुळे अंतर्गत नाराजी टाळण्याचा आणि पक्षातील समतोल राखण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे चित्र दिसून आले. एकूणच, महापौर आणि उपमहापौर पदांच्या निवडीत कोणताही राजकीय संघर्ष न होता समन्वयातून निर्णय घेण्यात आला. आता केवळ औपचारिक निवड प्रक्रिया पूर्ण होणे आणि अधिकृत घोषणा होणे बाकी असून, त्यानंतर नव्या महापौर व उपमहापौरांचा पदग्रहण सोहळा पार पडणार आहे. दरम्यान, दोन्ही उमेदवारांनी महापालिकेत जाऊन रितसर अर्ज दाखल केले. यावेळी आ.सुरेश भोळे, आ. मंगेश चव्हाण उपस्थित होते.

# पान १ वरुन

### केंद्रीय अर्थसंकल्पातून खान्देशच्या......

सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. विशेषतः दांकुनी (कोलकाता) ते सुरत या पूर्वपश्चिम समर्पित मालवाहू कॉरिडॉर (ईडब्ल्यूडीएफसी) प्रकल्पामुळे खान्देशचा आर्थिक आणि औद्योगिक चेहरा बदलण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून खान्देश भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीला थेट जोडला जाणार आहे. त्यामुळे देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय व्यापाराला गती मिळणार आहे. दुहेरी कॉरिडॉरचा लाभ - जळगाव, धुळे, नंदुरबार हे तिन्ही जिल्हे एकाच वेळी पूर्वपश्चिम समर्पित मालवाहू कॉरिडॉर तसेच दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर (डीएमआयसी) मध्ये समाविष्ट होत असल्याने या भागाला दुहेरी लाभ मिळणार आहे. देशी आणि विदेशी गुंतवणूकदारांसाठी खान्देश आकर्षक केंद्र म्हणून पुढे येईल. मोठे औद्योगिक प्रकल्प, एमएसएमई क्लस्टर आणि रोजगारनिर्मितीमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. अर्थसंकल्पात रेल्वे आणि हवाई दळणवळणालाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. मनमाड-इंदूर रेल्वे मार्गामुळे मध्य भारत आणि उत्तर महाराष्ट्रातील संपर्क अधिक सुलभ होणार असून, धुळे येथून विमान सेवा सुरू होण्याच्या दृष्टीनेही सकारात्मक हालचाली अपेक्षित आहेत. भविष्यात हवाई दळणवळण उपलब्ध झाल्यास उद्योग, व्यापारासोबतच पर्यटन क्षेत्रालाही मोठी चालना मिळेल. उत्तर महाराष्ट्र नवे विकास केंद्र - एकूणच रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक आणि लॉजिस्टिक्स यांची मजबूत साखळी उभी राहत असल्याने खान्देश उत्तर महाराष्ट्राचे प्रमुख विकासकेंद्र म्हणून उदयास येण्याची चिन्हे स्पष्ट होत आहेत. योग्य नियोजन, वेळेत अंमलबजावणी आणि प्रशासनाची सक्रिय भूमिका लाभल्यास येणारी १० वर्षे खान्देशसाठी सुवर्णसंधी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### १५ फेब्रुवारीला उत्तर महाराष्ट्र ......

करणाऱ्या संस्था, संघटना व संमेलनाच्या विरोधात भूमिका घेणे क्रमप्राप्त ठरते, असे बागूल यांनी म्हटले आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळ जीवनाच्या सर्व क्षेत्रात समतावादी संस्कृती व साहित्य विचारांचा पुरस्कार करते. विद्रोही साहित्य चळवळीच्या वतीने आजवर मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, सोलापूर, नंदुरबार,वाशी, पुणे, मनमाड, धुळे, परभणी, बुलढाणा, हिंगोली, नाशिक, उदगीर, वर्धा, अमळनेर, छत्रपती संभाजी नगर इत्यादी ठिकाणी साहित्य संमेलने, एक आंतरराज्य (निपाणी), एक विद्रोही महिला साहित्य संमेलन (पुणे) यशस्वीपणे आयोजित करण्यात आले आहे. बाबुराव बागूल, कवी वाहरू सोनवणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. अजिज नदाफ, आत्माराम कनिराम राठोड, कॉ. तारा रेड्डी, तुळसी परब, डॉ. आ. ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, डॉ. श्रीराम गुंदेकर, डॉ. प्रतिभा अहिरे. विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ. वासुदेव मुलाटे , डॉ.अशोक राणा यांसारख्या सर्जनशील साहित्यिकांनी यापूर्वी विद्रोही साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे भूषविली आहेत. आता विभागीय पातळीवर पहिल्यांदाच हे संमेलन होत आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष सतिश केदारे हे असून मुख्य निमंत्रक अमिन नवाब शेख,खजिनदार रामदास पगारे तर,मुख्य संयोजक प्रा.डॉ.जे.वाय. इंगळे व गुरुकुमार निकाळे हे आहेत. आजच्या विद्वेषाच्या कालखंडात संविधानिक लोकशाहीवर हल्ला होत असताना माणूसकीचा इतिहास, वारसा व त्याची पुर्नमांडणी करणाऱ्या बी.जे.वाघ यांची उत्तर महाराष्ट्र विभागीय पहिले विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करताना आम्हाला आनंद होत असल्याचे स्वागताध्यक्ष सतिष केदारे व मुख्य निमंत्रक अमिन नवाब शेख यांनी सांगितले.

### जम्मू-काश्मीरमध्ये पहाटेच......

खिडक्या आणि दरवाजे हादरले. काश्मीर खोरे भूकंपाच्या दृष्टीने संवेदनशील क्षेत्रात येते, जिथे वेळोवेळी सौम्य ते मध्यम भूकंप होतात. भूकंपानंतर, जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथके सक्रिय करण्यात आली आणि संवेदनशील भागांचे निरीक्षण सुरू करण्यात आले आहे.

### पाकिस्तान बॉम्ब हल्ल्यांनी......

जवान हुतात्मा झाले; तर पाकिस्तानी लष्कराने किमान १४५ दहशतवाद्यांना ठार केल्याचा दावा केला. या चिघळत असलेल्या संघर्षामुळे बलुचिस्तानमधील अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या बंडाकडे जगाचे लक्ष पुन्हा वेधले गेले आहे. मुख्य म्हणजे या हिंसाचारात इतर देशांचा, विशेषतः भारताचा हात असल्याच्या वारंवार होणाऱ्या आरोपांमुळे पुन्हा एकदा तीव्र राजनैतिक पडसाद उमटले आहेत. बलुचिस्तानमध्ये ४० तासांत नक्की काय घडले? पाकिस्तानच्या सुरक्षा दलांच्या तळांमध्ये घुसण्याचाही प्रयत्न केला. अनेक ठिकाणी हल्लेखोर नागरी वस्त्यांमधून फिरत होते, रस्ते अडवत होते आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य करत होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून लष्कर, पोलीस आणि दहशतवादविरोधी पथकांनी मोठ्याप्रमाणावर शोधमोहीम हाती घेतली. बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनी रविवारी सांगितले की, सुरक्षा दलांनी विविध ठिकाणी दहशतवाद्यांचा पाठलाग केल्यामुळे बलुचिस्तानमध्ये सलग ४० तास चकमकी सुरू होत्या. प्रांतीय प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, या हल्ल्यात १७ सरकारी अधिकारी आणि ३१ नागरिक मारले गेले. लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी ९२ आणि शुक्रवारी ४१ दहशतवाद्यांचे निर्दालन करण्यात आले.

### धुळे वनविभागाचा मोठा......

या गावांमध्ये वृक्षलागवड क्षेत्राभोवती चेन लिंक कुंपण व मुख्य प्रवेशद्वार तसेच विकेट गेट उभारले जाणार आहेत. यासाठी अनुक्रमे सुमारे ७८.६४ लाख, ८०.११ लाख आणि ६८.३३ लाख रुपये इतकी अंदाजित तरतूद करण्यात आली असून, सांगवी परिसरातील जामन्यापाडा, चोंडीनाला, शेमल्या आणि चांदसूर्या या गावांमध्ये कॅम्पा अंतर्गत लागवड क्षेत्रांसाठी चेन लिंक कुंपण उभारण्यात येणार आहे. या चारही कामांची अंदाजित किंमत सुमारे ६८ लाख ते ७८ लाख रुपयांच्या दरम्यान असून, ही कामे युद्ध पातळीवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### 'सरकारने घाबरु नये',......

करण्याचा प्रयत्न झाला. मात्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही आक्षेप घेतला. पुस्तक प्रकाशित झालं आहे की नाही ते राहुल गांधींनी सांगावं, अशी मागणी लोकसभेत करण्यात आली ज्यावरुन गदारोळ झाला.

पेंग्विन इंडियाने या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतली आहे. मात्र या पुस्तकाशी संबंधित प्रश्न हे फक्त राजकीय नाहीत. लष्करी अधिकारी आणि प्रमुख असलेल्या नरवणेंनी या पुस्तकात त्यांचे अनुभव लिहिले आहेत. आज जो गदारोळ झाला त्यामुळे हे पुस्तक पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. रिटायर्ड मेजर जनरल पी.के. सहगल यांच्याशी जनसत्ताने संवाद साधला तेव्हहा ते म्हणाले, 'नरवणे यांच्या पुस्तकात काय उल्लेख केला आहे? काय लिहिलं आहे ते मला माहीत नाही. मात्र पुस्तकाचे काही अंश लिक झाले आहेत. आता सत्य काय आहे ते लोकांना समजलं पाहिजे.

### ९० व्या वर्षी दलाई......

आहेत. विशेष म्हणजे, पुरस्कारामुळे ते या वर्षी पहिल्यांदाच ग्रॅमी जिंकणाऱ्या प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक स्टीवन स्पीलबर्ग आणि के-पॉप स्टार्सच्या यादीत सामील झाले आहेत. दलाई लामांचा प्रवास - ६ जुलै १९३५ रोजी तिबेटमधील एका छोट्या गावात दलाई लामा यांचा जन्म झाला. अवघ्या दोन वर्षांचे असतानाच त्यांची तिबेटमधील सर्वोच्च आध्यात्मिक गुरू म्हणून निवड करण्यात आली.

त्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मानवतेच्या सेवेसाठी आणि शांततेचा संदेश जगभर पोहोचवण्यासाठी समर्पित केले. तिबेटचा प्रश्न हिंसाचार न करता, शांततेच्या मार्गाने सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांबद्दल १९८९ मध्ये त्यांना नोबेल शांती पुरस्काराने गौरवण्यात आले. आता ग्रॅमी पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांच्या जागतिक पातळीवरील ओळख आणि प्रभाव आणखी वाढणार आहे.

# नॅशनल व्हॉईस मीडिया फोरमतर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंचा पुरस्कार देऊन सन्मान



प्रतिनिधी । शेगाव

**नॅशनल व्हॉईस मीडिया फोरमच्यावतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. नॅशनल व्हॉईस मीडिया फोरमच्यावतीने यंदा देखील मूकनायक पत्रकार वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष उत्तम वानखडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट अभिनेता भरत गणेशपुरे, स्वागताध्यक्ष तथा राष्ट्रीय महासचिव प्रकाश सरदार, लॉर्ड बुद्ध टीव्हीचे संचालक सचिन मून, ज्येष्ठ संपादक भूपेंद्र गणवीर, ॲड.राजेश झाल्टे, राष्ट्रीय संघटक दिनेश इखारे, राज्य संघटक पदमा मोहड, राज्य सदस्य विनोद सोनवणे, किरण उपाध्ये आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्याहस्ते राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ संपादक भूपेंद्र गणवीर यांनी मनोगत व्यक्त करतांना, आजच्या परिस्थितीत पत्रकारांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची पत्रकारिता जिवंत ठेवण्यासाठी आपले जीवन व्यतीत करावे. काही सत्ताधारी सरकारांची चाकरी करून पत्रकारितेची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत आहे. असे झाल्यास देशाचे वाटोळे होण्यास वेळ लागणार नाही, असे सांगून पत्रकारांनी प्रामाणिकपणे जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

### ● यांचा झाला सन्मान

कार्यक्रमात माजी सामाजिक न्यायमंत्री तथा आमदार राजकुमार बडोले यांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार, सनदभाई पटेल यांना उत्कृष्ट उद्योगपती रत्न पुरस्कार, माजी कामगार मंत्री तथा आमदार डॉ.संजय कुडे यांना उत्कृष्ट विकास रत्न पुरस्कार, अनिल मनोहर उंबरकर यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, भूपेंद्र गणवीर यांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, मोहित देवानंद दामोदर यांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा समाजभूषण पुरस्कार, महेश बनसोडे यांना उत्कृष्ट प्रबोधनात्मक चित्रपट निर्मिती पुरस्कार, संदीप प्रल्हाद बडगे यांना समाज प्रबोधनात्मक उत्कृष्ट गायक पुरस्कार, सचिन मून यांना बहुजन समाज जनजागृती रत्न पुरस्कार, अतिशभाई द्वारका खराटे यांना समाजभूषण पुरस्काराने तर तुषार वाघुळदे यांना बेस्ट अँकरिंग पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## जागतिक कुष्ठरोग दिनानिमित्त जनजागृती

प्रतिनिधी । जळगाव

डॉ.उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीत जागतिक कुष्ठरोग दिनानिमीत्त जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.सौरव मुले यांनी कुष्ठरोगाची कारणे, लक्षणे, निदान, उपचार व पुनर्वसन याविषयी माहिती दिली. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून लवकर निदान झाल्यास अपंगत्व टाळता येते. कुष्ठरोगग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसनामध्ये व सामाजिक पुनर्वसनामध्ये फिजिओथेरपिस्टची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

# हरे कृष्णा, हरे रामाच्या गजरात जळगावात निघाली पदयात्रा

प्रतिनिधी । जळगाव

**येथील (ईस्कॉन) मंदिरतर्फे श्रीकृष्ण चैतन्य महाप्रभु यांच्या वैष्णव परंपरेनुसार आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ, (ईस्कॉन) ही विश्वव्यापी संस्था श्रीकृष्ण भक्तीचा प्रचार जगभर करीत आहे. त्याचा भाग म्हणुन आंतरराष्ट्रीय किर्तीचे सन्यासी प्रचारक प.पु. सुंदर चैतन्य गोस्वामी महाराज (मॉरिशस) यांच्या उपस्थितीत जळगाव शहरातील नेहरू चौकापासून पदयात्रेस सुरूवात झाली. या पदयात्रेत प्रवचन व दिव्य हरिनाम संकिर्तनाचा जयघोष करण्यात आला.**

या हरिनाम संकिर्तन पदयात्रेचे आयोजन दि.२ रोजी दुपारी २ ते संध्याकाळी ६ वाजेदरम्यान करण्यात आले होते. या पदयात्रेस बिग बाजार नेहरू चौक येथुन प्रारंभ होऊन



नेहरू चौक, टॉवर चौक, चित्रा चौक, गणेश कॉलनी, मानराज पार्क, गुजराल पेट्रोल पंप, पिंप्राळा बाजार पट्टा, हरे कृष्ण मंदिरमार्गे पिंप्राळा येथील मयुर कॉलनी येथे सांगता करण्यात आली. या ठिकाणी प.पु. सुंदर चैतन्य गोस्वामी महाराज यांचे प्रवचन होवून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. पदयात्रेत एका बैलगाडीवर भगवंतांची मूर्ती सजविलेली होती. तर भक्त हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे, हरे राम हरे राम राम राम हरे हरे या महामंत्राचे गायन करीत होते. दरम्यान, दि.३ व ४ रोजी संध्याकाळी ६ ते ९ वाजेदरम्यान पोलीस मुख्यालयाजवळील पोलीस पद्मालय हॉल येथे महासत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प.पु. सुंदर चैतन्य गोस्वामी महाराज यांचे प्रवचन होईल.

# अजितदादांच्या रुपाने आपण 'मास लीडर' गमावला

## ● धरणगावात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली भावना

प्रतिनिधी । धरणगाव

**राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री कै. अजितदादा पवार यांचा नुकताच विमान अपघातात दुर्दैवी व करूण अंत झाला. दादांच्या रूपाने महाराष्ट्र राज्याने व देशाने एक 'मास लीडर' गमावला. ज्याला बहुजन समाजाच्या समस्यांची खोलवर जाणीव व गाढा अभ्यास होता, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कै. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहिली.**



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे धरणगाव शहराध्यक्ष लक्ष्मणराव पाटील यांच्यासह पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करतांना, मागील ३५ ते ४० वर्षांपासून सक्रिय राजकारणात ठसा उमटविणारे तसेच ६ वेळा ज्यांनी महाराष्ट्र सारख्या पुरोगामी राज्याचे उपमुख्यमंत्री पद भूषविले असे कै. अजित पवार म्हणजे अतिशय अभ्यासू नेतृत्व होते. अजितदादांकडे जर कोणी काही कामाच्या निमित्ताने गेले तर त्यासाठी भलमोठं पत्र लिहून समस्या मांडावी असं बंधन नसायचं. एखाद्या साद्या कागदाच्या तुकड्यावर जरी काही समस्या लिहून दिली तरी, त्यावर तोडगा निघायचा. परंतु, जर त्या चिठ्ठीवर कुठे काना-मात्रा किंवा वेलांटी चुकलेली असेल तर त्याबाबत आधी सूचना मिळायची. ज्याचं काम चौकटीत बसण्यासारखं किंवा होण्यासारखं नसेल त्याला जागेवर नकार मिळायचा आणि ज्याचं काम होण्यासारखं असेल त्यासाठी काय प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल ती करण्याची दादांची तयारी असायची, अशा आठवणींना उजाळा दिला.

## शहर सहसचिवपदी नरेश बागडे यांची निवड



प्रतिनिधी । जळगाव

गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघातर्फे पद्मालय विश्रामगृह येथे रविवार, दि.१ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाच्या जळगाव शहर सहसचिवपदी नरेश बागडे यांची निवड करण्यात आली.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नरेंद्र कदम, सहसचिव भगवान सोनार, उपाध्यक्ष रवींद्र पवार, ललित खरे, केंद्रीय कार्याध्यक्ष सागरभाऊ ओतारी व जिल्हाध्यक्ष चेतन वाणी यांच्याहस्ते नरेश बागडे यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ **कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन, शिस्त, सकारात्मक दृष्टिकोन ठेवून जीवन घडवावे!

## प्रा.शरद पाटील यांचे मत; विद्यावर्धिनी महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप

प्रतिनिधी । धुळे

**माणसाच्या जीवनाला रिव्हर्सचे बटण नसते. एकदा गेलेला काळ, घेतलेले निर्णय व केलेली कृती पुन्हा बदलता येत नाही. त्यामुळे प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन, शिस्त व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून जीवन घडवावे, असे प्रतिपादन प्रा.शरद पाटील यांनी केले.**



विद्यावर्धिनी महाविद्यालयातर्फे वार येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा नुकताच समारोप झाला. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जगदीश पाटील हे होते प्रमुख पाहुणे म्हणून वार गावाचे सरपंच दिलीप पाटील उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा.पाटील यांनी, भाषा शुद्ध किंवा अशुद्ध नसून त्यामागील भाव महत्त्वाचा असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी न लाजता विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. अशा शिबिरातून तरुणांची सर्वांगीण जडण घडण होते. सेवाभाव माणसाला समाजाशी जोडतो. ग्रामीण जीवनाची प्रत्यक्ष अनुभूती मिळून आत्मविश्वास वाढतो, असे नमूद केले. तर प्राचार्य डॉ. जगदीश पाटील यांनी, माणूस ज्ञानवंत होईपर्यंत शिक्षणाची प्रक्रिया कधीही थांबत नाही. काळानुसार व संस्कृतीतील बदलांनुसार प्रगतीचे आयाम बदलत असतात. त्यामुळे युवकांनी शाश्वत विकासाचा ध्यास घेत सामाजिक जबाबदारीने कार्य करावे, असे आवाहन केले.

### व्यसनमुक्तीसह वृक्षारोपण, स्वच्छतेवर जनजागृती

**शिबिरात ग्रामस्वच्छता, स्मशानभूमी स्वच्छता व दुरुस्ती, श्रमदान, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती व विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. शिबिराचा अहवाल रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. बाजीराव पाटील यांनी सादर केला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.राजीव आरके, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मंजू तरडेजा, प्रा.प्रतीक्षा पाटील यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन दिव्या तमखाने यांनी केले. आभार विवेक पाटील यांनी मानले. विद्यार्थी प्रतिनिधी शैलेश पवार व शिल्पा पाडवी या स्वयंसेवकांनी मनोगत मांडले.**

# धरणगावात दिवंगत अजितदादांना सर्वपक्षीयांकडून आदरांजली

## असा नेता पुन्हा होणे नाही; ना.गुलाबराव पाटील



प्रतिनिधी । धरणगाव

**राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनानंतर धरणगाव शहरात सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली होती.**

शोकसभेत पालकमंत्री गुलाबराव पाटील, आ.अनिल पाटील, अनिल पाटील, डॉ. व्ही.डी. पाटील, डी.जी. पाटील, संजय पवार, प्रा.आर. एन.महाजन, प्रा.एन.डी. पाटील, गुलाबराव वाघ, मोहन पाटील, रमेश पाटील, भगवान महाजन, सुभाष पाटील, ज्ञानेश्वर महाजन, नगराध्यक्षा लीलाबाई चौधरी, डॉ.संजीवकुमार सोनवणे, माजी मंत्री गुलाबराव देवकर, प्रा.डी. आर. पाटील, जानकीराम पाटील, डी.ओ. पाटील, राजेंद्र वाघ, जयदीप पाटील, दीपक वाघमारे, लक्ष्मणराव पाटील, पी.एम. पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा.ए.आर. पाटील आदी मान्यवरांनी संवेदना व्यक्त केली.

यावेळी राष्ट्रवादी (श.प.) युवती सभेच्या जिल्हाध्यक्षा कल्पिता पाटील, माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, पुष्पा महाजन, उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन, नगरसेविका ज्योती पाटील, हेमांगी अग्निहोत्री, राष्ट्रवादी (अ.प.) पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील, रोटरी क्लबचे डॉ.अतुल शिंदे, ॲड. संजय महाजन, बाळासाहेब जाधव, नंदलाल महाजन, गोरखनाथ देशमुख, गोपाळ पाटील, वासुदेव चौधरी, समीर भाटिया, महेंद्र तायडे, सम्राट धनगर, रणजीत शिकरवार, ॲड. व्ही.एस. भोलाणे, ॲड.शरद माळी, नगरसेवक विनय भावे, निलेश चौधरी, भागवत चौधरी, सुनील चौधरी, परमेश्वर महाजन, विलास महाजन, तौसिफ पटेल, हेमंत महाजन, पवन महाजन, लक्ष्मण माळी, बुट्या पाटील, किरण मराठे, संतोष सोनवणे, जितेंद्र धनगर, गजानन महाजन, रामचंद्र माळी, रमेश चव्हाण, महेश पवार, ॲड.संदीप पाटील, धनराज माळी, नाटेश्वर पवार, कैलास माळी, वाल्मीक पाटील, शामकांत पाटील, दीपक जाधव, बापू जाधव, पत्रकार कडूजी महाजन, डी.एस. पाटील, विजय वाघमारे, धर्मराज मोरे, विनोद रोकडे आदींसह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकार, वैद्यकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक अभिजित पाटील यांनी तर सूत्रसंचालन चंदनराव पाटील व गुलाब मराठे यांनी केले.

## थोडक्यात

### अजित पवार यांचे अस्थिकलश आज नंदुरबारात

**नंदुरबार ।** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते स्व.अजित पवार यांचे अस्थिकलश मंगळवार, दि.३ रोजी नंदुरबार येथे दाखल होणार असून सकाळी १० ते दुपारी ४ वाजेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा कार्यालयात सर्वसामान्य नागरीक, कार्यकर्ते, पदाधिकारी व चाहत्यांना दर्शन घेता येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे यांनी दिली. नागरिकांनी शांतता व शिस्त पाळून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

### हळदाणी ग्रामसभेत विविध विषयांवर झाली चर्चा

**नवापूर ।** तालुक्यातील हळदाणी ग्रामपंचायतीची ग्रामसभा नुकतीच पार पडली. या ग्रामसभेत २०२६ मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध कामांसह प्रत्येक गावात म्हणजे दोन पाण्याचे टँकर आराखडयात घेणे, अंगणवाडी, शाळा दुरूस्तीची काम करणे. जलजीवन मिशनचे अपूर्ण काम पूर्ण करणे यासह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी विविध समस्या देखील मांडल्या. ग्रामसभेला सरपंच छायाबाई गावीत, कंथु गावीत, इलामजी गावीत, ग्रामपंचायत सदस्यांसह हळदाणी, गडदाणी मासलीपाडा, बर्डीपाडा कन्हाळा, ढोरपाडा, गताडी आदी गावांतील ग्रामस्थ उपस्थित होते.

### ग्राम महसूल अधिकारी जयेंद्र अहिरे यांचा सत्कार

**नंदुरबार ।** शहादा तालुक्यातील कुकडेल येथील ग्राम महसूल अधिकारी जयेंद्र परमल अहिरे यांनी सन २०२४-२५ या महसूल वर्षात जिल्हयातील विविध शासकिय कामकाजात केलेल्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्याहस्ते प्रतासत्ताक दिनी झालेल्या कार्यक्रमात प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, पोलीस अधीक्षक श्रवणदत्त एस, उपविभागीय अधिकारी अंजली शर्मा, शिवाशू सिंह आदी उपस्थित होते.

# थकित करधारकांना अभय योजनेतून ५० टक्के शास्ती माफी

## जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठवणार; आ.चंद्रकांत रघुवंशी यांची माहिती

प्रतिनिधी । नंदुरबार

**नगरपालिका क्षेत्रातील थकीत मालमत्ता करधारकांना शासनाने २ टक्के शास्ती लावलेली असून या शास्तीच्या रक्कमेतून ५० टक्के रक्कम अभय योजनेतून माफ व्हावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना नगरपरिषदेकडून प्रस्ताव सादर करून त्यांच्याकडून मान्यता घेतली जाईल, अशी माहिती शिवसेनेचे संपर्कप्रमुख आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी दिली.**



पुढे बोलतांना आ. रघुवंशी यांनी सांगितले की, २ टक्के शास्तीतून ५० टक्के शास्ती माफ करण्याच्या अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे तर ५० टक्के रक्कम माफ करण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे. मालमत्ता धारकांनी ५० टक्के शास्तीची रक्कम भरूनच कराचा भरणा करायचा आहे.

मालमत्ता धारकांना ५० टक्के शास्ती माफ व्हावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना नगरपरिषदेकडून प्रस्ताव सादर करून त्यांच्याकडून मान्यता घेतली जाईल. यासाठी शहरातील नागरिकांनी अभय योजनेचा फॉर्म नगरपालिका कार्यालयात भरून द्यावयाच्या आहे.

कार्यालयातच ५० टक्के शास्तीची रक्कम भरण्यात येईल. शास्तीची ५० टक्के रक्कम शासनाने माफ केली तर मालमत्ता धारकांनी भरलेल्या रकमेचे समायोजन करून भरलेल्या करात जमा होईल आणि पुढील वर्षात मालमत्ता कर कमी घेण्यात येईल. या आर्थिक वर्षात अभय योजनेच्या लाभ घेतला तरच फायदा होईल. ३१ मार्चपूर्वी शास्तीची रक्कम भरावी लागेल, अन्यथा भविष्यात २ टक्के शास्तीची रक्कम भरावी लागेल. त्यामुळे नागरिकांनी अभय योजनेचा लाभ घेऊन कराचा भरणा करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# पाळधी येथे मोफत उद्योग-व्यवसाय मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी । धरणगाव

**स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असलेल्या युवक-युवतींसाठी जीपीएस मित्रपरिवारच्यावतीने मोफत उद्योग-व्यवसाय मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन गुरुवार, दि.५ रोजी सायंकाळी ५ वाजता पाळधी (ता. धरणगाव) येथील शासकीय विश्रामगृह येथे करण्यात आले आहे.**

जीपीएस मित्रपरिवारतर्फे नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असतात. त्याचाच एक भाग म्हणून गुरुवार, दि.५ रोजी उद्योग-व्यवसाय मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यात जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी उपस्थित राहणार असून सीएमईजीपी, पीएमईजीपी तसेच इतर शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. तसेच विविध राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी उपस्थित राहून कर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, बँकांची भूमिका व अनुदान मिळविण्याची पद्धत याबाबत माहिती देणार आहेत. मेळाव्यात अण्णासाहेब पाटील महामंडळ, इतर मागासवर्गीय महामंडळ, अमृत योजना यांसह विविध शासकीय कर्ज व अनुदान योजनांची माहिती देण्यात येणार आहे. याशिवाय उद्योगाची योग्य निवड, जिल्हा उद्योग केंद्रामार्फत मिळणारे अनुदान, तसेच विविध महामंडळांच्या योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाणार आहे. पोल्ट्री फार्म, डेअरी, ब्यूटी पार्लर, शेळी पालन, लॉन्ड्री, फळे, भाजी विक्री, केटरिंग, मेडिकल, बेकरी, किराणा दुकान, ढाबा-हॉटेल, प्रोसेसिंग उद्योग आदी विविध व्यवसायांसाठी शासकीय अर्थसहाय्य कसे मिळवावे याची सविस्तर माहिती या मेळाव्यात दिली जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री गुलाबराव पाटील हे राहणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी, बँक ऑफ बडोदाचे विभागीय व्यवस्थापक सुनिल देशमुख, पुणे येथील महा.संशोधन उन्नती व प्रक्षिन प्रबोधिन अमृतचे राजेंद्र कानडे, लिड बँक मॅनेजर श्री.डोहरे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक संतोष दराडे, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक आर.आर. डोंगरे, बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक प्रविण सिंह, आण्णासाहेब पाटील महामंडळाचे जिल्हा समन्वय दीपक बोरसे, इतर मागासवर्गीय महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक योगेश पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### जीपीएस मित्रपरिवारचा उपक्रम

उद्योग-व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असलेल्या सर्व युवक-युवती व नागरिकांनी या मोफत मार्गदर्शन मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जीपीएस मित्रपरिवारच्यावतीने करण्यात आले आहे.

# हजला जाणाऱ्या यात्रेकरुंसाठी उद्यापासून लसीकरण शिबीर

प्रतिनिधी । धुळे

**हज यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरुंसाठी धुळे महापालिका प्रशासनातर्फे तीन दिवसीय लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून शिबिराला बुधवार, दि.४ पासून जुन्या महानगरपालिकेतील कुटुंब कल्याण केंद्र येथे सुरुवात होणार आहे. सर्व हजयात्रेकरूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनपा आयुक्त नितीन कापडणीस यांनी केले आहे.**

दरवर्षी मे आणि जुन महिन्यात यात्रेकरू हजयात्रेसाठी रवाना होतात. त्यामुळे दरवर्षी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार यात्रेकरूना हज यात्रेला जाण्यापूर्वी आरोग्य हितासाठी मेनिंजायटिस प्रतिबंधक लस, सिझनल इन्फ्लुएन्झा लस व ओरल पोलिओ देण्यात येतो. यंदा देखील या लस यात्रेकरुंना देण्यात येणार असून धुळे मनपाला लससाठा प्राप्त झाला आहे. त्यामुळे हजला जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी बुधवार, दि.४, गुरुवार, दि.५ व शुक्रवार, दि.६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.३० वाजेदरम्यान, लसीकरण शिबीर आयोजीत करण्यात आले आहे. जुन्या महानगरपालिकेतील कुटुंब कल्याण केंद्र येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले असून यात्रेकरूंनी शिबिरासाठी येताना सोबत आपले आधार कार्ड, पासपोर्ट, हेल्थ चेकअप कार्ड, कमिटी कार्ड, सर्व हेल्थ चेकअप रिपोर्ट व आपल्याला सध्या सुरु असलेल्या सर्व औषधांची माहिती सोबत आणावी, असे आवाहन आयुक्त नितीन कापडणीस यांनी केले आहे.

# अमळनेर तालुक्यात ६७ ग्रामपंचायतींवर प्रशासक

## जि.प., पं.स., ग्रा.पं. निवडणुकांमुळे ग्रामीण राजकारण तापणार

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील तब्बल ६७ ग्रामपंचायतींची मुदत फेब्रुवारी २०२६ मध्ये संपत असून, या ग्रामपंचायतींवरील सरपंच व सदस्यांचा कार्यकाळ समाप्त झाल्याने आता तेथे प्रशासकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे तालुक्यात सरपंच राज संपुष्टात येऊन प्रशासक राज सुरू होणार आहे.**

अमळनेर तालुक्यात एकूण ११९ ग्रामपंचायती असून, त्यापैकी आंचलवाडी, आर्डी, आटाळे, बोदर्डे, बोहरा, धानोरा, दापोरी बुद्रुक, धावडे, ढेकू खुर्द, देवगाव, चौबारी, एकलहरे, एकतास, फापोरे बुद्रुक, एकरुखी, गांधली, गडखांब, गलवाडे खुर्द, गलवाडे बुद्रुक, हिंगोणे खुर्द (प्र.अ व प्र.ज), जवखेडा, जुनोने, जळोद, करणखेडे, कळंबे, कलाली, कावपिंप्री, कळमसरे, कंडारी, कुहे बुद्रुक, खेडी (प्र. व प्र.ज), खवशी, लोण खुर्द, लोण चारम, मेहेरगाव, म्हसले मांडळ, मुडी (प्र.अ), निंभोरा, नांद्री, निम, पिळोदे, पातोंडा, पाडसे, पळासदळे, प्र.डांगरी, पिंगळवाडे, पिंपळे बुद्रुक, पिंपळी (प्र.ज), पाडळसरे, रामेश्वर बुद्रुक, रामेश्वर खुर्द, सारबेटे बुद्रुक, सारबेटे खुर्द, सावखेडा, सबगव्हाण, सोनखेडी, सात्री, शिरूड, शहापूर, तांदळी, टाकरखेडे, वासरे, वाघोदे व झाडी आदी ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यात येणार आहेत.

दरम्यान, आगामी काळात पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच ग्रामपंचायत निवडणुका होणार असल्याने ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. ग्रामपंचायत निवडणुकांतील नाराजीचा फटका सत्ताधाऱ्यांना पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांत बसू नये, यासाठी तसेच न्यायालयीन प्रक्रियेमुळे ग्रामपंचायत निवडणुका लांबल्याने आधी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका घेणे क्रमप्राप्त ठरत असल्याने ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची वेळ आली आहे. मात्र, दीर्घकाळ निवडून आलेले लोकप्रतिनिधी नसल्याने ग्रामस्थ व मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासक राजामुळे स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष होणार का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

# दादांनी साथ दिली नसती तर..; आ.अनिल पाटील यांची भावुक श्रद्धांजली

## अमळनेरच्या विकासात अजितदादांचा मोठा वाटा; सर्वपक्षीय शोकसभेत मान्यवरांची भावना

प्रतिनिधी । अमळनेर

**सतत वेळ पाळणाऱ्या अजितदादांनी २८ ला जीवनाची वेळ पाळली नाही. संपूर्ण महाराष्ट्राला वेदना देणारे कार्य नियतीने केले. आता आम्ही कोणाकडे बघायचे. २०१६ मध्ये माझ्यावर कर्जाचा डोंगर झाला होता. मी भाजपचा असताना देखील त्यावेळी दादांनी पाठीवर हात ठेवला नसता तर कदाचित मी आत्महत्या करण्याच्या तयारीत होतो, अशा शब्दात ऋण व्यक्त करत आमदार अनिल पाटील यांनी सर्व पक्षीय शोकसभेत श्रद्धांजली अर्पण केली.**






शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार याना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवार, दि.१ रोजी सर्वपक्षीय शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार अनिल पाटील पुढे म्हणाले की, अमळनेर तालुक्यात होणारा विकास, कायापालट यात अजितदादांचा मोठा वाटा आहे.

आपल्या आमदारांच्या समस्या ऐकून प्रत्येकाला भावाप्रमाणे वागणूक देऊन न्याय देण्याचे काम त्यांनी केल्याचे ते म्हणाले.

यावेळी माजी आ.साहेबराव पाटील, माजी आ.डॉ. बी.एस. पाटील, नगराध्यक्ष डॉ.परिक्षित बाविस्कर, जेष्ठ नेत्या तिलोत्तमा पाटील, भैरवी पलांडे, डॉ.अविनाश जोशी, संजय पुनाजी पाटील, संदीप घोरपडे, डी.एम. पाटील, शिवाजी पाटील, बी.के. सूर्यवंशी, मनोज पाटील, भागवत पाटील, डी.एम. पाटील, खा.शि. मंडळाचे चेअरमन निरज अग्रवाल, वसुंधरा लांडगे, माजी सभापती डॉ.दीपक पाटील, सरपंच संघटनेतर्फे महेंद्र बोरसे, ॲड.शकील काझी, ॲड.तिलोत्तमा पाटील, मंगळ ग्रह मंदिरतर्फे दिलीप बहिरम, आम आदमी पार्टीतर्फे प्रा.गणेश पवार, नितीन भदाणे, इम्रान खाटिक, रिपाईतर्फे यशवंत बैसाणे, शिवसेनातर्फे महेश देशमुख, अनिल शिसोदे, मुन्ना शर्मा, अमित पाटील, प्रा.योगिता कापडणे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संजय पाटील यांनी केले.


# धरणगावात तुकाराम महाराज जयंती उत्साहात

## अंधश्रद्धा, अनिष्ट रुढींच्या विरोधात लढणारे तुकोबाराय : नगराध्यक्षा चौधरी

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील कुणबी पाटील समाजाच्या वतीने समाज सभागृहात जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. तत्पूर्वी संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

यावेळी नगराध्यक्षा लीला चौधरी, अध्यक्ष आबा पाटील तसेच पंच मंडळाच्या उपस्थितीत संत तुकाराम महाराजांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव प्रेमराज पाटील यांनी केले. याप्रसंगी नवनिर्वाचित नगराध्यक्षा लीला चौधरी यांचा समाजाच्या वतीने अनिता राजेंद्र पाटील यांनी सत्कार केला.



यावेळी बोलताना नगराध्यक्षा लीला चौधरी म्हणाल्या की, संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून व कीर्तनातून समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरांविरोधात प्रखर आवाज उठवला होता. आजही त्यांच्या विचारांतून आपल्याला सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा मिळते. त्यांच्या शिकवणीवर चालत समाज अधिक सुसंस्कृत व प्रगत करण्याची गरज आहे, असे भावनिक प्रतिपादन नगराध्यक्षा लीला चौधरी यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास समाजातील असंख्य बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपाध्यक्ष दीपक पाटील यांनी केले तर उपस्थितांचे आभार सहसचिव त्र्यंबक पाटील यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खजिनदार राहुल पाटील यांच्यासह समाजाच्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संरक्षण मजूर दिनेश कोळी यांचा उत्कृष्ट सेवेबद्दल सन्मान



प्रतिनिधी । चोपडा

तालुक्यातील वैजापूर रेंज मधील संरक्षण मजूर म्हणून कार्यरत असलेल्या दिनेश दोधू कोळी यांचा उल्लेखनीय सेवेबद्दल प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. वैजापूरचे वनक्षेत्रपाल विवेक ठाकरे, चोपडा येथील वनक्षेत्रपाल बी.के.थोरात यांच्या उपस्थितीत सहाय्यक उपवनसंरक्षक एम. बी. पाटील यांच्या हस्ते दिनेश कोळी यांना ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

वनसंवर्धन व वनसंरक्षणाच्या कामात गेली काही वर्षे मोलाची सेवा देणाऱ्या दिनेश कोळी यांच्या कार्याची दखल घेऊन करण्यात आलेल्या सत्कारामुळे त्यांचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे .

## थोडक्यात

### लासगाव येथे आजपासून अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे आयोजन

**पाचोरा ।** तालुक्यातील बांबरुड राणीचे येथून जवळच असलेल्या लासगाव येथे सालाबाद प्रमाणे दि.२ ते ९ फेब्रुवारीपर्यंत अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहनिमित्त अनुक्रमे पहिल्या दिवशी बांबरुड राणीचे येथील हरिभक्त परायण मृदंगाचार्य व कीर्तनकार पंडित महाराज पवार यांचे तर सलग शुभम महाराज मंदानेकर रितेश महाराज कांचनपूरकर, ह.भ.प. राजेंद्र महाराज केकतनिंभोरेकर, रविदास महाराज वरसाडेकर, ह.भ.प. जितेश महाराज म्हसावदकर, ह.भ.प. मच्छिंद्र महाराज वाडीभोकर तर काल्याचे कीर्तन हरिभक्त परायण सूर्यभान महाराज शेळगावकर यांचे कीर्तन होणार आहे. यासाठी परिसरातील लासगाव, सामनेर आसनखेडा, नांद्रा, कुरंगी, माहेजी, बांबरुड येथील भजनी मंडळ उपस्थित राहणार आहे.

### गजानन महाराज प्रकटदिनी यावल येथे विविध कार्यक्रम

**यावल ।** येथील विरारनगरमधील गजानन महाराज मंदिरात दि. ८ फेब्रुवारी रोजी श्री गजानन महाराज प्रकट दिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ६ वाजता 'श्री'च्या मूर्तीचे अभिषेक व आरती सकाळी ८ वाजता श्री रेणुकादेवी मंदिरापासून ते श्री गजानन महाराज मंदिर विरारनगर इथपर्यंत 'श्री'च्या पादुकांची भव्य पालखी मिरवणूक. दुपारी ११.३० वाजता यागाची पूर्णाहुती व महानैवेद्य आरती दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे वाटप, दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत तारकेश्वर भजनी मंडळ यावल यांच्या भजनाचा कार्यक्रम, संध्याकाळी ७ वाजता श्री गजानन महाराजांची आरती व संध्याकाळी ८ वाजता हभप राजेंद्र अंबिकार महाराज केकत निंभोरेकर तालुका जामनेर यांचे कीर्तन आयोजित केले आहे.

# घाई, चिंता, आहाराच्या संतुलनासाठी योगाभ्यास आवश्यक

## पंकज समूहाचे अध्यक्ष डॉ. सुरेश बोरोले यांचे प्रतिपादन, विद्यार्थ्यांनी गिरविले योगाचे धडे

प्रतिनिधी । चोपडा

**घाई, चिंता, आहाराच्या संतुलनासाठी योगाभ्यास आवश्यक असल्याचे प्रतिपादन पंकज समूहाचे अध्यक्ष डॉ. सुरेश बोरोले यांनी केले. पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था, चोपडा यांच्या वतीने पंकज विद्यालयात सहा दिवसीय योग शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते.**




या योग शिबिरात नियमित पूरक हालचाली, सूर्यनमस्कार, पाठीवर व पोटावर झोपून करावयाची विविध आसने, बैठक व दंड स्थितीतील आसने, शुद्धीक्रिया, प्राणायाम, ध्यानस्थिती तसेच प्रार्थनेचे प्रात्यक्षिक सराव घेण्यात आले. शिबिरासाठी विद्यालयातील योगशिक्षक योगेश चौधरी व उपशिक्षिका गायत्री शिंदे यांचे प्रेरणादायी व शास्त्रशुद्ध मार्गदर्शन लाभले.

शिबिरात संस्थेचे विभागप्रमुख, शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मार्गदर्शन करताना डॉ. सुरेश बोरोले यांनी Hurry (घाई), Worry (चिंता) आणि Curry (आहार) यांचे संतुलन राखण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. कोणत्याही बाबतीत घाई करू नये, चिंता मानसिक ताण वाढवते. तसेच आहार संतुलित असावा. या तिन्ही बाबींचे योग्य संतुलन साधल्यास योगामुळे निरोगी आरोग्य लाभते, असे त्यांनी प्रभावीपणे मांडले. शिबिराच्या शेवटी योग शिबिराचा लाभ स्वत:च्या आरोग्यासह कुटुंब व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घ्यावा, असे आवाहन बोरोले यांनी केले. जीवनात आरोग्य व सकारात्मक विचारांचे महत्त्व स्पष्ट करत योगेश चौधरी यांनी उपस्थितांचे प्रबोधन केले. यावेळी मार्गदर्शक शिक्षकांचा विभागप्रमुखांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




# निमगव्हाण येथे मोफत अग्निकर्म शिबिर उत्साहात

## शेकडो रुग्णांना आयुर्वेदिक उपचारांचा लाभ

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील निमगव्हाण येथील तीर्थक्षेत्र श्री धुनिवाले दादाजी दरबार येथील सभागृहात दि.१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत आयोजित करण्यात आलेले मोफत अग्निकर्म शिबीर अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले.**

भारत व आयुर्वेदाची प्राचीन आणि प्रभावी चिकित्सा पद्धत असलेल्या अग्निकर्म उपचार पद्धतीद्वारे विविध आजारांवर मोफत उपचार करण्यात आल्यामुळे परिसरातील नागरिकांनी या शिबिरास मोठा प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये मस, तीळ, ग्रंथी, गाठी, तसेच गोंदलेले काढणे, कंबरदुखी, टाचदुखी, पायांचे दुखणे, साईटिकाचे दुखणे, भरपूड अशा वेदनादायक व त्रासदायक आजारांवर अग्निकर्म पद्धतीने उपचार करण्यात आले. प्राचीन काळात अग्निकर्माला डाग देणे, असे संबोधले जात असल्याची माहिती यावेळी उपस्थित रुग्णांना देण्यात आली. आधुनिक वैद्यकीय उपचारांना पर्याय म्हणून आयुर्वेदिक पद्धतीने वेदनांपासून कायमस्वरूपी आराम मिळू शकतो, याचा अनुभव अनेक रुग्णांनी घेतला. या शिबिरात जळगाव येथील सुप्रसिद्ध अग्निकर्म तज्ज्ञ तथा आयुर्वेदाचार्य वैद्य उदय तल्हार यांनी उपचार केले. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवामुळे उपचार अत्यंत शिस्तबद्ध, सुरक्षित व परिणामकारक पद्धतीने पार पडले.




**शिबिरात निमगव्हाण गावासह चोपडा तालुक्यातील व तापी परिसरातील रुग्णांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शिबीर यशस्वीतेसाठी देवानंद पाटील, अनिल शिवाजी बाविस्कर, विजय पौलाद पाटील, विशाल पाटील, अशोक पाटील, ललित पाटील, मिथुन पाटील यांनी परिश्रम घेतले. तसेच स्थानिक कार्यकर्ते, दादा सेवा समितीचे स्वयंसेवक यांनी शिस्तबद्ध नियोजन करून शिबीर यशस्वी केले. यावेळी डॉ.किशोर महाजन, डॉ.ज्ञानेश्वर पाटील, डॉ.दीपक चौधरी, डॉ.सत्यम पाटील आदी उपस्थित होते.**

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत, सुरक्षित व प्रभावी आयुर्वेदिक उपचारांचा लाभ मिळाला. अनेक रुग्णांनी उपचारानंतर वेदनांमध्ये लक्षणीय फरक जाणवल्याचे सांगितले. आयोजकांच्या या सामाजिक उपक्रमाबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत भविष्यातही अशा आरोग्यविषयक शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# मॅक्रो व्हिजन शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी । रावेर

**मॅक्रो व्हिजन शाळेत आयोजित करण्यात आलेला सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा कार्यक्रम उपस्थित मान्यवर, पालक व नागरिकांच्या उपस्थितीत रंगतदार ठरला.**



या कार्यक्रमास नगराध्यक्षा संगीता महाजन, उद्योजक श्रीराम पाटील, डॉ. सुचिता कुयटे, डॉ. योगिता पाटील, डॉ. अमिता महाजन, प्रमोद पाटील, स्वप्नील पाटील, विनायक पाटील, ॲड. प्रवीण पासपोहे, भास्कर महाजन, विजय गोटीवाले, होमराज पाटील, प्रकाश चौधरी, आशा पाटील, वनिता पाटील, रेखा गोटीवाले, मीनाक्षी पासपोहे, प्राचार्य जे. डी. धनगर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनानंतर कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी प्रारंभी राज्यांचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुचिता कुयटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. मात्र आजच्या स्पर्धात्मक युगात हंगामी अभ्यास करून उत्तुंग यश मिळणार नाही. सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना मोबाईल व सोशल मीडियापासून दूर ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांना गुड टच-बॅड टच बाबत योग्य मार्गदर्शन करणेही अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शानदार नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. विविध सांस्कृतिक सादरीकरणांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. शाळेने केलेली आकर्षक सजावट, उत्कृष्ट प्रकाश व्यवस्था आणि दर्जेदार संगीत व्यवस्था यामुळे कार्यक्रमाच्या सादरीकरणात अधिकच भर पडली. कार्यक्रम यशस्वितेसाठी शाळेचे शिक्षक व कर्मचारी वर्ग यांनी मोठे परिश्रम घेतले.

### राधा गोविंद ज्ञानोदय विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

कर्की येथील राधा गोविंद ज्ञानोदय विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.


या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेच्या मुला-मुलींनी त्यांचे सुप्त गुणांनी कार्यक्रम सादर केले. त्यांच्या कार्यक्रमात गावकऱ्यांनी व परिसरातील लोकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आनंद घेतला. त्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक एम.पी.धायले यांनी स्वीकारले. प्रमुख पाहुणे म्हणून एन. ए. देशमुख उपस्थित होते.

# चोपडा नगरपालिकेतर्फे आज रंगणार अन्नपूर्णा महोत्सव

## 'माझी वसुंधरा अभियान'; 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत प्रथमच पर्यावरणपूरक पाककला स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी । चोपडा

**येथील नगरपरिषदेमार्फत नगराध्यक्ष नम्रता पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या संकल्पनेतून 'माझी वसुंधरा अभियान' व 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत प्रथमच अन्नपूर्णा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये महिला बचत गटांचे विविध खाद्य स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व स्थानिक पारंपरिक खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.**



याचबरोबर महिलांसाठी पर्यावरणपूरक पाककला स्पर्धा २०२६ चेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये पर्यावरणपूरक साहित्याचा वापर, आरोग्यदायी व पारंपरिक पाककृतींना विशेष महत्त्व देण्यात येणार आहे. हा उपक्रम पूर्णपणे प्लास्टिकमुक्त व कचरा कमी करणे, या संकल्पनेवर आधारित आहे. महिलांसाठी हळदी-कुंकूचा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आलेला आहे. यात महिलांना सहभागाचे आवाहन केले आहे.

**• संपूर्ण कार्यक्रम दि. ३ फेब्रुवारी रोजी अक्कासो शरदचंद्रिका सुरेश पाटील नाट्यगृह मंदिर येथे सायंकाळी ४ वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत महिलांच्या कौशल्यांना व सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळणार आहे. तरी या अन्नपूर्णा महोत्सवात खाद्य स्टॉलला नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद द्यावा व पाककला स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन चोपडा नगर परिषदेमार्फत मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी केले आहे.**

# भारत विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

प्रतिनिधी । यावल

**न्हावी येथील भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राथमिक विभाग व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला.**

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष शरद महाजन तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षणाधिकारी निळकंठ गायकवाड आणि जळगाव जिल्ह्याचे शिक्षक नेते एस. डी. भिरूड होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून नितीन चौधरी, देवेंद्र चोपडे, प्रा.एम. टी. फिरके, धनंजय फिरके, प्रवीण वारके, भानुदास चोपडे, सुनील फिरके, शशिकांत चौधरी, अरुण गाजरे, डी. ए. पाटील उपस्थित होते. प्रथम मुख्याध्यापक व्ही. बी. वारके यांनी प्रास्ताविक सादर केल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सर्व मान्यवरांचे स्वागत आणि सन्मान झाल्यानंतर शोभा तळेले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तयार केलेले हस्तलिखित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आदर्श विद्यार्थी म्हणून नागेश्वर गणेश कळसे इयत्ता १० वी आणि आदर्श विद्यार्थिनी म्हणून युक्ता राजेश बोरोले इयत्ता १२ वी यांची निवड करण्यात आली आणि त्यांना ट्रॉफी आणि रोख बक्षीस देण्यात आले.